# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक ०४ मार्च, २०२० / फाल्गुन १४, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |
| **(३) अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** | |
| **(४) शालेय शिक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** | |
| **(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(७) परिवहन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(८) पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री** | |

**प्रश्नांची एकूण संख्या - ४७**

### खामगाव-जालना रेल्वेमार्गाचे काम सुरु करणेबाबत

**(१) * १७०९ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ व मराठवाड्याला जोडणारा खामगाव-जालना रेल्वेमार्ग ब्रिटिश काळापासून मंजूर असून त्यावेळी सदर रेल्वेमार्गाचे कामही सुरू झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गासाठी अनेक वेळा जन आंदोलने झाल्यानंतर सन २०१६ या वर्षामध्ये केंद्र शासनाने खामगाव-जालना रेल्वे मार्गाला मान्यता दिली, तथापि अद्यापही या मार्गाचे कोणतेही काम सुरू झालेले नसून महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर बोर्ड यांना कोणत्याही प्रकारच्या कामाचा कार्यारंभ आदेश दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने आपल्या हिश्याच्या निधीच्या वितरणास सहमती दर्शविल्याशिवाय या रेल्वेमार्गाचे काम सुरु होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाने आपल्या हिश्याचा निधी देऊन या मार्गातील अडचणी दूर करण्याबाबत लेखी निवदेन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना नागपूर येथे घेतलेल्या आढावा बैठकीदरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१), (२) व (३) खामगाव-जालना रेल्वेमार्गाचा सर्व्हे ब्रिटीश काळात करण्यात येऊन ग्रेट इंडियन पेनीनसुला रेल्वे कंपनी मार्फत सदर नवीन रेल्वेमार्गाचे काम हाती घेण्यात आल्याची कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्यानंतर केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालयाने सन २०१६-१७ या वर्षी भांडवली गुंतवणूक कार्यक्रमांतर्गत खामगाव-जालना या रेल्वेमार्गाचा समावेश केलेला असून दिनांक ०६.०२.२०१९ च्या आदेशान्वये या मार्गाचा सर्व्हे करण्यासाठी निधी मंजूर केलेला आहे. त्यानुसार सदर रेल्वेमार्गाचा सर्व्हे झाल्यानंतर प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार होऊन प्रकल्पास नव्याने मान्यता देणे अपेक्षित आहे.
(४) होय.
(५) सदर प्रकल्पास मान्यता देणेबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

**(२) * ४७५६ श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राष्ट्रीय पेयजल योजना बंद केल्यामुळे जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील आदिवासी क्षेत्रातील ६७ गांवे व ७० आदिवासी पाडे पाण्यापासून वंचित असल्याचे तसेच मौ.कोपर, मांढवे, आंबे, मुथाळणे, जांभुळशी, हातवीज या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची कोणतीही योजना अस्तित्वात नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५२ गावांसाठी शिवकालीन टाकी बांधकामासाठी रुपये ४४५ लक्ष, ३१ गावांच्या नवीन पाणीपुरवठा योजनेकरिता रुपये १४५८.६७ लक्ष, त्याचप्रमाणे १८ गावांतील नादुरुस्त पाणीपुरवठा योजनासाठी रुपये २३२ लक्ष अशी आर्थिक तरतूद शासनाने करुनही सदरच्या योजना दीर्घकाळापासून शासनस्तरावर प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवकालीन पाण्याच्या टाक्या व पाणीपुरवठा योजनांच्या जागेची परवानगी उपविभागीय अधिकारी वा तहसिलदार स्तरावर नसल्यामुळे योजना राबविण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त सर्व योजना कार्यान्वीत होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पळसगड (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील पाणी पुरवठा योजना पुर्ववत सुरु करणेबाबत

**(३) * ३५३४ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळसगड (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील मौजा पळसगड, सलंगटोला व मौशी या गावांकरीता तयार करण्यात आलेली पाणी-पुरवठा योजना मागील वर्षभरापासुन बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहील्या आठवड्यात शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंद असलेली पाणी-पुरवठा योजना पुर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

मौ.पळसगड (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथे सन २०१७ पासून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौ. पळसगड व मौ. मौर्शी या दोन गावांचा समावेश असलेल्या मंजुर योजनेतून सुरळीत पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. योजनेचा कंत्राटदाराचा दोष निवारणाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर योजनेचे परिचलन, देखभाल दुरूस्ती करिता दिनांक १.०२.२०१८ ला सदर योजना ग्रामपंचायत पळसगड ता.कुरखेड, जि.गडचिरोली यांना हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. मौ.सलंगटोला येथे नळ पाणी पुरवठा योजना नाही.

(२) मौ.पळसगड (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील सदर योजनेच्या पंपात बिघाड झाल्याने व पंप बंद असल्याने १५ ते २० दिवस ही योजना बंद होती. या कालावधीत गावांत असलेल्या विहिरी, हातपंप व सौर ऊर्जेवर अधारीत लघु नळ पाणी पुरवठा योजना अशा स्त्रोताद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच सदर पाणी पुरवठा योजनेच्या पंपाची दुरूस्ती ग्रामपंचायतीद्वारे करून दिनांक ०७.०१.२०२० पासून पाणी पुरवठा पुर्ववत सुरू करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत गावांमध्ये सुरळीत पाणी पुरवठा सुरू आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बहुतांश नवीन ग्रंथालयांना शासन मान्यता मिळण्याबाबत

**(४) * २४७२ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन**

**पटेल (मुंबादेवी), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश नवीन ग्रंथालयाची शासन मान्यता मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत कार्यरत ग्रंथालयांना गत ८ वर्षापासून श्रेणीवाढ वा अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांच्या दर्जानुसार देय परिरक्षण अनुदान किती ग्रंथालयांना अदा करण्यात आले आहे वा येत आहे.

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१), (२) व (३) मा.मंत्रीमंडळाच्या दि. ०६ मार्च, २०१३ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि. २२ मार्च, २०१३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षापासून नवीन ग्रंथालयांना शासनमान्यता व कार्यरत ग्रंथालयांना दर्जावाढ देण्यात येत नाही. तथापि नियमातील तरतुदीनुसार कार्यक्षम शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांच्या दर्जानुसार देय परिरक्षण अनुदान नियमित अदा करण्यात येत आहे.

राज्यात दिनांक ३१ मार्च, २०१९ अखेर १२,१४९ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. सन २०१९-२० मध्ये संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडे सन २०१८-१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सादर केलेल्या १०,६१२ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दर्जानुसार अनुज्ञेय परिरक्षण

अनुदानाचा पहिला हप्ता प्रदान करण्यात आला आहे. तसेच माहे फ़ेब्रुवारी/मार्च-२०२० मध्ये परिररक्षण अनुदानाचा दुसरा/एकत्रित हप्ता प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(५) * २२१५ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी २०१६-१७ मध्ये प्रस्तावित भावली (ता.इगतपुरी, जि.नाशिक) धरणाच्या पाण्यावर आधारीत नळ पाणी पुरवठा योजनेस मान्यता तसेच दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी जलसंपदा विभागाने १२.६९ द.ल.घ.मी. पाण्याच्या आरक्षणास मान्यता देऊन सुधारीत शासन निर्णय काढण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या सन २०१४ च्या निर्णयानुसार दरडोई खर्च निकषापेक्षा अधिक असल्याने या योजनेस मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची मंजूरी मिळणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहापूर तालुक्यातील ९७ गावांतील पाणी टंचाई दूर व्हावी याकरीता या योजनेच्या प्रस्तावास अद्याप पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या उच्चाधिकार समितीने मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत वा त्यानुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय.
(२) होय.

(३) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील टंचाईग्रस्त ९७ गावांसाठी इगतपूरी येथील भावली धरणाच्या पाण्यावर आधारित नळ पाणी पुरवठा योजनेस मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखालील गठित उच्चाधिकार समितीने दिनांक ०४.०२.२०२० रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिमूर (जि.चंद्रपूर) येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्याबाबत

**(६) * १२१७ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, चिमूर किंवा पोलीस उपविभागीय कार्यालय चिमूर, जिल्हा चंद्रपूर येथील इमारतीच्या जागी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृह विभागाच्या दिनांक १८ जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार चिमूर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीच्या जागेवर किंवा पोलीस उपविभागीय कार्यालयाच्या जागेवर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय सुरु करणे भौगोलिक दृष्ट्या सोयीचे असल्याने ते स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय चिमूर येथे स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त विचाराधीन असलेल्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१), (२) व (३) शासन निर्णय दि.१८.०६.२०१८ अन्वये मोटार वाहन विभागांतर्गत नवीन कार्यालय निर्मितीसंदर्भात निकष विहित केले आहेत. त्यानुसार एखाद्या जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन जिल्हा निर्माण झाला असेल तर या नवीन जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये नवीन परिवहन कार्यालयाची स्थापना करावी. इतर कोणत्याही परिस्थितीत नवीन कार्यालयांची स्थापना करण्यात येऊ नये आणि ज्या जिल्ह्यांची लांबी जास्त आहे अशा जिल्ह्यांमध्ये जनतेच्या सोईसाठी नवीन परिवहन कार्यालय उघडण्याऐवजी वाहन चालक चाचणी केंद्र तसेच वाहन तपासणी व परिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत असे निकष आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यासाठी चंद्रपूर येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय कार्यान्वीत आहे. सबब, चिमूर जि.चंद्रपूर येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करणे शक्य नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद व लातूर जिल्हयात वॉटर ग्रीड योजनेची कामे पूर्ण करणेबाबत

**(७) * १३१९ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात सतत पडत असलेल्या दुष्काळामुळे मागील अनेक वर्षे सरासरी पेक्षा कमी प्रमाणात पर्जन्यमान झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी दोन्ही जिल्हयातील अतिमहत्वाकांक्षी व जनतेस संजीवनी देणा-या मराठवाडा वॉटर ग्रीडच्या कामास शासन निर्णय क्रमांक पापुयो-२०१९/प्र.क्र.१६४/पापु १८, दि.१७ सप्टेंबर, २०१९ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडयातील उस्मानाबाद व लातूर या जिल्हयात वॉटर ग्रीडची कामे करण्यासाठी अनुक्रमे रुपये १४०९.५७ कोटी व रुपये १७१२.९१ कोटी अशा एकूण रुपये ३१२२.४८ कोटीच्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता

तसेच आरएफक्यु जाहिर करण्यास दिनांक ७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या तत्कालीन मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पाचे काम त्वरीत सुरु करण्याची लेखी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री महोदयांकडे केली असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, दि. ९ सप्टेंबर, २०१९ च्या तत्कालीन बैठकीत HAM आधारित निविदा मागविण्यास मंजूरी देण्यात आली तसेच शासन निर्णय दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यांसाठी अनुक्रमे रु.१७१२.९१ कोटी व रु.१४०९.५७ कोटी अशा एकूण रु.३१२२.४८ कोटी या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) वरीलप्रमाणे लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याचा पाणी ग्रीड प्रकल्पाचा HAM आधारित निविदा दि.१८/९/२०१९ रोजी मागविण्यात आल्या आहेत. निविदेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) प्रलंबित पाणीपुरवठा योजनांबाबत

**(८) * ४७२२ श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यात माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तिवरे धरण फुटल्यामुळे परिसरातील अपूर्ण असलेल्या तिवरे, आकले व कादवड गावांच्या पाणीपुरवठा योजना पुर्ण करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी केल्यानंतर शासनाने केवळ तिवरे या एकाच पाणीपुरवठा योजनेसाठी निधी मंजूर केला असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित आकले व कादवड या गावाच्या पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव त्याचवेळी जिल्हा प्रशासनाकडे पाठविण्यात आले परंतु या योजनांसाठी शासनाने निधी मंजूर केला नाही हे, ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पाणीपुरवठा योजनांसह शिरगाव-मुढे, खडपोली, कळकवणे, वालोटी व ओवळी आदि गावांसाठी ग्रॅव्हिटी योजना राबविण्यासंदर्भात दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री यांचे दालनात संबंधित अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत सदर पाणीपुरवठा योजनांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश मा.राज्यमंत्री महोदयांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार उपरोक्त सर्व पाणीपुरवठा योजना पुर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) तिवरे, आकले व कादवड नळ पाणी पुरवठा दुरुस्तीच्या प्रस्तावापैकी तिवरे येथील नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्तीस जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालयाने दिनांक ०२.११.२०१८ रोजी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(२), (३) व (४) आकले व कादवड नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे कामाच्या प्रस्तावास अंदाजित रक्कम अनुक्रमे रुपये १२,७१,५१७/- रुपये ४,४१,०१६/- दिनांक ३१.१०.२०१९ व दिनांक ०२.१२.२०१९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास प्रशासकीय मंजूरीस्तव सादर करण्यात आले आहेत. सदरहून कामांकरिता जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने पुनर्विनियोजनातून निधी उपलब्धतेनंतर मान्यता देणे प्रस्तावित आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत शिरगाव-मुंढे तर्फ चिपळूण नळ पाणी पुरवठा योजनेस (अंदाजित रक्कम रु.६७२.६८ लक्ष) दिनांक १८.१०.२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदर योजनेचे काम प्रगतीतथावर आहे.

जल जीवन अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खडपोली, कळकवणे, वालोटी व ओवळी या गावासाठी नळ पाणी पुरवठा योजनेसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

मुंढे गावासाठी स्वतंत्र वितरण व्यवस्थेची आवश्यकता पाहून प्रस्ताव स्वतंत्ररित्या सादर करण्याचे निर्देश दिनांक १४.०१.२०२० रोजीच्या बैठकीत दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील राष्ट्रीय पेयजल आराखडयातील सर्व गावांमध्ये नळ पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत

**(९) * १३९१ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयामध्ये सन २०१८-१९ अंतर्गत राष्ट्रीय पेयजल आराखडयात २२१ गावांचा समावेश असून प्रत्यक्षात केवळ ७५ गावांतील योजनांना मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित गावांसाठी ही योजना कार्यान्वित करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे,

सन २०१८-१९ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या आराखडयात समावेश असलेल्या २२१ योजनांपैकी ६८ योजनांना मंजूरी देण्यात आली आहे.

(२) उर्वरीत १५३ योजनांचा समावेश सन २०१९-२० च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या आराखडयात करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ (जि.यवतमाळ) शहरात स्वस्त धान्य दुकानदार धान्याची काळया बाजारात विक्री करीत असल्याबाबत

**(१०) * २६९६ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) शहरात स्वस्त धान्य दुकानातील रुपये ३ लाख ९३ हजार ७५० किंमतीचे प्रत्येकी ५० किलो वजनाच्या तांदूळाची २२५ पोती हस्तगत केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून गोरगरिबांना वाटण्यासाठी अल्प दरामध्ये स्वस्त धान्य दुकानदारांना दरमहा धान्य पुरवठा केला जात असून त्या धान्याची अनेक दुकानदार काळया बाजारात विक्री करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी टोळी विरोधी पथक व अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पथकाने घटनास्थळी छापा टाकून ट्रक व पिकअप अशा दोन्ही वाहनातील एकूण रुपये २३ लाख ९४ हजार ५०० इतक्या किंमतीचा माल जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मुद्देमाल कोण-कोणत्या स्वस्त धान्य दुकानातील आहे व संबंधित दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) सहाय्यक पोलीस निरीक्षक, टोळी विरोधी पथक, यवतमाळ यांनी रु.३,९४,९७५/- किंमतीच्या तांदळाचे भरलेले २२५ कट्टे जप्त केले आहेत.

(२) सद्य:स्थितीत शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ई पॉस मशिनद्वारे कार्डधारकांना अंगठ्याचा ठसा घेऊन धान्य वितरीत केले जात असल्यामुळे काळ्या जारात धान्य विक्री होण्याची शक्यता नाही.

(३) व (४) घटनास्थळावरुन एक ट्रक व एक टेम्पोसह अंदाजे रु.२३,९४,७५०/- किंमतीचा माल दि.१६.१२.२०१९ रोजी ताब्यात घेण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांना स्थगिती देण्याचा घेतलेला निर्णय

**(११) * ३७१४ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: दौंड (जि.पुणे) व हिंगोली जिल्हयातील राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत येणाऱ्या योजनांना स्थगिती देण्याचा निर्णय राज्य शासनाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१९ - २० च्या वार्षिक कृती आराखड्यात मंजूर असलेल्या नवीन योजनांमध्ये दौंड तालुक्यातील १६ पाणीपुरवठा योजनांचा समावेश असून त्याबाबत प्रशासकीय मान्यता देणे, निविदा प्रक्रिया करणे व सदर प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यादेश देण्याची कार्यवाही शासनाच्या पुढील सूचनेपर्यंत न करण्याचा आदेश देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंगोली जिल्हयातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत जिल्हा परिषदेने तांत्रिक मान्यतेसाठी वरिष्ठ कार्यालयाने मान्यता दिलेल्या प्रस्तावांच्या कामांना शासनाने स्थागिती दिली असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कार्यवाही होऊन राज्यातील सर्व पेयजल योजेनेंतर्गत येणाऱ्या पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) केंद्र शासनाने चालू आर्थिक वर्षापासून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची जल जीवन मिशनमध्ये पुनर्रचना केली असून जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने दि.२५.१२.२०१९ रोजी प्रसिध्द केल्या आहेत. त्यानुसार दिनांक ०८.०१.२०२०, ३०.०१.२०२० व १२.०२.२०२० रोजी नव्याने परिपत्रक काढून कार्यादेशावरील सर्व योजनांचे कार्यादेश तात्काळ देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे इतर योजनांबाबत जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचना तपासून निविदा काढावी व प्रशासकीय मान्यता द्यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण, मुरबाड व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासींच्या शिधापत्रिकेवर केरोसिन उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१२) * ५५३२ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण, मुरबाड व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात माहे ऑगस्ट, २०१९ पासून रॉकेलचा शिधापत्रिकेवरील पुरवठा बंद केल्यामुळे जिल्हयातील गरीब आदिवासी, कातकरी कुटुंबाना केरोसिन मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिधापत्रिकेवरील केरोसिनचा पुरवठा बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शिधापत्रिकेवरील केरोसिनचा पुरवठा पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) दि. १ ऑगस्ट, २०१८ च्या शासन परिपत्रकानुसार गॅस जोडणी नसलेल्या शिधापत्रिकाधारकांना त्यांच्याकडून गॅसजोडणी नसल्याबाबतचे हमीपत्र घेऊन केरोसिनचा पुरवठा करण्यात येतो. जिल्हयांकडून प्राप्त मागणीनुसार १००% केरोसिन कोटा मंजूर करण्यात येतो. मुरबाड व शहापूर तालुक्यामध्ये केरोसिनची मागणी नसल्यामुळे माहे ऑगस्ट, २०१९ पासून जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडून केरोसिन नियतन मंजूर करण्यात आलेले नाही.

कल्याण तालुक्यामध्येही मागणी नसल्यामुळे ऑगस्ट २०१९ चे केरोसिन नियतन मंजूर करण्यात आलेले नाही. सप्टेंबर ते डिसेंबर २०१९ या कालावधीसाठी केरोसिन नियतन मंजूर करण्यात आले. तथापि, ऑईल कंपनीकडून पुरवठा न झाल्याने सप्टेंबर व ऑक्टोबर २०१९ मध्ये शिधापत्रिकाधारकांना प्रत्यक्षात केरोसिन प्राप्त झाले नाही. नोव्हेंबर व डिसेंबर २०१९ मध्ये शिधापत्रिकाधारकांना केरोसिनचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(३) फेब्रुवारी व मार्च २०२० साठी दि.०७.०२.२०२० च्या शासन आदेशान्वये सर्व जिल्हयांना त्यांच्या मागणीनुसार केरोसिन नियतन मंजूर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयात पावसाळयात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पुरेशा शेड अभावी धान भिजून झालेले नुकसान

**(१३) * २६७ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये पुरेशे शेड नसल्याने शेकडो शेतकऱ्यांचे धान भिजले असल्याने आधारभूत धान खरेदी केंद्र बंद करण्यात येऊन कृषी उत्पन्न बाजार समितीने भिजलेले धान खरेदी करण्यास नकार दिला असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान खरेदी केंद्र सुरु करुन खरेदी केलेले धान ठेवण्यासाठी पुरेशा शेड उभारण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

नमुद कालावधीत गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली, आरमोरी, चामोर्शी, अहेरी व सिरोंचा या पाच कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी भिजलेले धान खरेदी करण्यास नकार दिल्याची बाब निदर्शनास आलेली नाही किंवा त्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील धान्य वितरण कार्यालयातील अनागोंदी कारभाराबाबत

**(१४) * ६२५३ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील स्वस्त धान्य दुकानदारांकडील ई-पॉस मशिनमधुन नागरिकांच्या रेशनकार्डचा डेटा गायब होणे, धान्य वितरण कार्यालयाकडून नागरिकांचे शिधापत्रिकेला आधारकार्ड लिंक करताना गैरव्यवहार होणे तसेच नागरिकांना शिधापत्रिका वाटप करतांना अनेक स्वरुपाच्या चुका होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथील अनेक सेतु कार्यालयांच्या अनागोंदी कारभारामुळे नागरिकांची मुळ कागदपत्रे गहाळ झाली असून त्यांना नवीन शिधापत्रिका काढणे, नाव कमी करणे, धान्य न मिळणे व उत्पन्नाचा दाखला मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंद करण्यात आलेल्या सेतु कार्यालयातील कागदपत्रे जिल्हा प्रशासनाने ताब्यात न घेतल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२) हे अशंत: खरे आहे.

सेतु केंद्र मंजूरीच्या करारनामा व अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये सेतु केंद्र बंद करण्यात आले. सेतु केंद्र बंद करण्यात आल्यानंतर तहसिलदार नाशिक यांनी कागदपत्रे व दस्तऐवज ताब्यात घेऊन त्यामध्ये नागरिकांचे जे अर्ज प्रलंबित होते त्यावर तहसिलदार नाशिक यांचे कार्यालयातुन कार्यवाही करण्यात आली आहे. अपवादात्मक ज्या प्रकरणांत स्वीकारलेले अर्ज मिळुन आले नाहीत त्या प्रकरणांत नागरिकांचे मदतीने दुय्यम प्रकरण तयार करुन कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे त्यासदर्भातील कोणत्याही तक्रारी नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) अशी बाब नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली येथील वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीअरींग विद्यालयामध्ये प्राध्यापकांच्या भरतीत अनियमितता झाल्याबाबत

**(१५) * १६८३ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीअरींग विद्यालयामध्ये प्राध्यापकांच्या भरतीत गैरव्यवहार झाला असल्याच्या अनेक तक्रारी शासनास "आपले सरकार" या पोर्टलद्वारे प्राप्त झाल्या असल्याचे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या संदर्भातील गोपनीय चौकशी पूर्ण केली असून त्याबाबतचा अहवाल शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्याने सुधारणा झालेल्या भ्रष्टाचार प्रतिबंधित कायद्याच्या कलम १७ नुसार भ्रष्टाचाराच्या प्रकरणावर ३ महिन्याच्या कालावधीत निर्णय घेणे बंधनकारक असताना सदर अहवालावरील निर्णय प्रलंबित ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार अहवालास विलंब करणारा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग तसेच गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन प्रकरणी आपले सरकार या पोर्टलवर तसेच लेखी स्वरुपात तक्रार प्राप्त झाली आहे.

(२), (३) व (४) वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय सांगली यांनी केलेल्या अनियमिततेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, सांगली या कार्यालयाने गृहविभाग मंत्रालय यांच्यामार्फत उच्च व तंत्र शिक्षण विभागास पडताळणी अहवाल सादर केला आहे.

या पडताळणी अहवालात नमुद केलेल्या लोकसेवकांविरुद्ध तक्रारीतील मुद्दे हे भ्रष्टाचार प्रतिबंधक (सुधारित) कायदा २०१८ मध्ये समाविष्ट होतात किंवा कसे याची पडताळणी करण्यास गृह विभागास उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१६.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये विचारणा करण्यात आली होती.

तक्रारीतील मुद्दे हे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गैरवर्तणूक या सदराखाली येत असल्याचे तसेच सदर अभिकथित गैरवर्तन लोकसेवकांनी आपल्या पदाची कामे व कर्तव्य पार पाडताना केलेली असल्याने कांही तक्रारी ह्या प्रशासकीय स्वरुपाच्या असल्याने त्यात तथ्य आहे किंवा कसे याबाबत प्रथम संबंधित प्रशासकीय विभागाने चौकशी करणे आवश्यक असून तथ्य आढळल्यास पुढील चौकशी/अन्वेषण यासाठी शासनाने लाचलूचपत प्रतिबंधक विभागास प्राधिकृत करणे उचित होईल, असे अभिप्राय गृह विभागाने दि. २०.०२.२०२० रोजी दिले आहेत.

त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना तक्रारीतील मुद्याबाबत सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्यास कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील नवीन वस्तीगृहाच्या बांधकामाबाबत

**(१६) * ३९२ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या नवीन वसतीगृहाकरीता शासनाने सन २०१८ च्या अर्थसंकल्पात रूपये १० कोटी मंजुर केले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतीगृहाच्या बांधकामाचा प्राथमिक आराखडा मंजुरीसाठी सार्वजनीक बांधकाम विभाग नागपूर यांच्याकडे मागील दिड वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनीक बांधकाम विभाग नागपूर यांच्याकडुन विद्यापीठाच्या आराखड्याच्या मंजुरीकरिता होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त विद्यापीठाच्या नवीन वसतीगृहाच्या विकासकामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या विभागातील संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) नाही.

तथापि, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे नवीन वसतिगृहाकरिता विद्यापीठाच्या साधारण निधीतून सन २०१७-१८ मध्ये विद्यापीठाच्या अर्थसंकल्पामध्ये रु.१० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

(२) प्रस्तावित विद्यापीठाच्या वसतिगृहाच्या बांधकामाचा रु.४१,९६,६९,८२०/- इतक्या रक्कमेचा प्राथमिक आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाने विद्यापीठास दिला होता.

विद्यापीठाद्वारे वसतिगृहाच्या कामाचे विस्तृत आराखडे व अंदाजपत्रकाची सार्वजनिक बांधकाम विभाग यांना मागणी केली असून विस्तृत आराखडे व अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयात शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(१७) * ४६४४ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील शहर व गावातील पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यांच्या अनुजैविक तपासणीमध्ये काही पाण्याचे नमुने दुषित असल्याने पिण्यास अयोग्य असल्याचे दुय्यम निष्कर्ष तपासणी अहवालात आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरांमध्ये व गावामध्ये दुषित पाणी पुरवठा होत असल्याने भविष्यात दुषित पाण्यामुळे नागरिकांना गंभीर आजार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार हिंगोली जिल्हयातील नागरिकांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे आहे.

माहे डिसेंबर, २०१९ मध्ये हिंगोली जिल्हयातील शहरी व ग्रामीण विभागातील एकूण ६३६ पाणी नमुने तपासले होते, त्यापैकी ७८ पाणी नमूने दूषित आढळलेले आहेत. ग्रामीण भागातील ५१८ पैकी ७५ व शहरी भागातील ११८ पैकी ३ नमूने दूषित आढळलेले आहेत. पाणी नमुन्यांचा तपासणी अहवाल, पाणी नमूने प्रयोगशाळेत पाठविणा-या संबंधित संस्थांना त्वरित कळविण्यात आले आहेत.

(३) ग्रामीण भागात नागरिकांना शुध्द व सुरक्षीत पाणी पुरवठा करण्याकरीता प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये जलसुरक्षक यांची नियुक्ती करण्यात आलेली असून, या जलसुरक्षकामार्फत पाण्याचे नियमित शुध्दीकरण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा एमआयडीसी मधील (जि.रायगड) मेडलाईफ इंटरनॅशनल प्रा.ली. या कंपनीवर केलेल्या कारवाईबाबत

**(१८) * ४२२ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा एमआयडीसी मधील मेडलाईफ इंटरनॅशनल प्रा. ली. (द्वारा स्नोमन लॉजिस्टिक लिमिटेड) या कंपनीवर अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारवाई दरम्यान संरक्षण विभाग, शासकीय वैद्यकीय विमा, शासकीय रुग्णालये व गरीब व गरजू लोकांसाठी असणाऱ्या औषधांवरील लेबलवर खाडाखोड करून त्याच्यावर पुन्हा प्रिंटिंग करून ती खुल्या बाजारात बेकायदेशीर विक्री करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीचे संचालक व व्यवस्थापक यांच्या विरोधात अन्न व सौंदर्य प्रसाधन कायद्याअंतर्गत तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर कारवाई दरम्यान संरक्षण विभाग व शासकीय रूग्णालयासाठी असणाऱ्या औषधांवरील लेबलवर खाडाखोड करून ती खुल्या बाजारात बेकायदेशीर विक्री करत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र सदर औषधांच्या लेबलवर पुन्हा प्रिंट केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी मे. मेडलाईफ इंटरनॅशनल प्रा.लि. या आस्थापनेचा अन्न व औषध प्रशासनाकडील परवाना रद्द करण्यात आला आहे. तसेच, सदर

पेढीविरूध्द तळोजा पोलीस ठाण्यात औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यान्वये दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने पोलीसांकडून संबंधितांविरूध्द पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी येथील जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयातील दस्ताऐवज गहाळ झाल्याबाबत

**(१९) * ५१३३ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद परभणी येथील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयातील संचमान्यता, वैयक्तिक मान्यता, पद मान्यता, शालार्थ व वेतनेतर अनुदान या संदर्भातील अत्यंत महत्वाच्या नोंदी असणारे दिनांक १ जानेवारी २०१५ पूर्वीचे दस्तऐवज गहाळ झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचे निकष डावलून परभणी जिल्ह्यातील अनेक शिक्षण संस्थेतील रिक्त पदांना वैयक्तिक मान्यता देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) वैयक्तीक मान्यता प्रकरणांची चौकशी विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांचे स्तरावरुन करण्यात आली. त्यामध्ये चुकीची मान्यता दिलेल्या संबंधीत शिक्षणाधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## कोल्हापुर जिल्हयातील राधानगरी, भुदरगड, गगनबावडा तालुक्यामधील धनगरवाडयांमधील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(२०) * ३८७७ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्हयातील राधानगरी, भुदरगड, गगनबावडा तालुक्यातील धनगरवाडयांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे सर्व सामान्य नागरीक त्रस्त झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाडया-वस्त्यांवर असणाऱ्या कुपनलीकांनाही पाणी नसल्याने विंधन विहिर पुनर्भरण व नव्याने विंधन विहिर खोदण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०१९-२० करिता संभाव्य पाणी टंचाई निवारण कृती आराखड्यामध्ये नवीन विंधन विहिर घेणे या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, विंधन विहिर पुनर्भरण या उपाययोजनेचा समावेश टंचाई कृती आराखड्यात नाही. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विंधन विहिर पुनर्भरण करण्याबाबतचा आराखडा तयार करणेच्या सूचना संबंधिताना जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे स्तरावरून दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ४४ पेक्षा अधिक अध्यापक महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(२१) * ४०७३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयांमध्ये अध्यापक अपूऱ्या पायाभूत सुविधा व शिक्षकांच्या नेमणूका न करणे इत्यादी कारणांमुळे ४४ पेक्षा अधिक अध्यापक महाविद्यालयांच्या मान्यता रद्द करण्याचा निर्णय राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत त्या महाविद्यालयात पहिल्या दोन फेरीतून व व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१), (२) व (३) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेने, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या सुधारीत मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तींची पुर्तता न करणाऱ्या अध्यापक महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याचे आदेश पारीत केले आहेत. सदर आदेश, आदेशाच्या दिनांकाच्या पुढील विद्यासत्राच्या शेवटपासून लागू करण्यात आले आहे. त्यामुळे, अध्यापक महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अडचणी निर्माण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रस्ता सुरक्षेसाठी तरतूद केलेला निधी विनावापर पडून असल्याबाबत

**(२२) * ६१६ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी सद्यस्थितीत रस्ता सुरक्षा सप्ताह सुरू असताना रस्ता सुरक्षा अभियानासाठी तरतूद केलेला १०० कोटी रुपयांचा निधी विनावापर पडून असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यात एकूण ११ ठिकाणी अत्याधुनिक वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्रे उभारण्यासाठीचा हा निधी वापरात न आल्याने राज्यात या केंद्राअभावी अत्याधुनिक वाहन चाचणीला खीळ बसलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, मुंबईसह राज्यातील ११ ठिकाणची अत्याधुनिक वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्रे तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्यापपर्यंत रस्ता सुरक्षेसाठी तरतूद केलेल्या निधीचा वापर करण्यात आला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे नाही.

रस्ता सुरक्षा निधीच्या प्रयोजनासाठी परिवहन आयुक्त यांच्या नावे स्वीय प्रपंजी खाते (PLA) उघडण्यात आले असून दि.०४.०१.२०२० अखेर उक्त खात्यात रु. ६४,७३,७६,८५८/-जमा करण्यात आलेले आहेत. त्यापैकी रु.२९,६६,८१,७८०/- एवढा निधी खर्ची पडलेला असून दि.३१.०१.२०२० अखेर रु.३५,०६,९५,०७७/- इतका निधी उक्त खात्यात शिल्लक आहे.

(२), (३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२९५/२०१५ मध्ये रस्ता सुरक्षा विषयक बाबींचा वेळोवेळी आढावा घेऊन मा.सर्वोच्च न्यायालयास अहवाल सादर करण्यासाठी रस्ता सुरक्षा समितीची स्थापना केली आहे. सदर समितीने दिलेल्या निर्देशानुसार रस्ता सुरक्षाविषयक कामकाजासाठी स्वतंत्रपणे रस्ता सुरक्षा निधी निर्माण करण्यात आलेला आहे. त्यानुसार रस्ता सुरक्षेच्या प्रयोजनार्थ विविध प्रस्तावांना मान्यता देण्याकरीता दि.०१.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली रस्ता सुरक्षा निधी नियंत्रण समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या

दि.२४.०४.२०१९ रोजीच्या बैठकीत रु.१७०.३१ कोटीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली असून त्याप्रमाणे दि.२१.०६.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. यामध्ये परिवहन कार्यालयात परिवहन वाहनांची तपासणी करण्यासाठी १० निरिक्षण व परिक्षण केंद्र (I & C Centers) उभारणी करण्यासाठी रु. १३६.३३ कोटीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरे-वारे समुद्र (ता.जि.रत्नागिरी) किनाऱ्यावर प्राणी संग्रहालय व स्नेकपार्क उभारण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२३) * ३९८ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे-वारे समुद्र (ता.रत्नागिरी,जि.रत्नागिरी) किनाऱ्यावर जयपुरच्या धर्तीवर प्राणी संग्रहालय व स्नेकपार्क उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) मा.पालक मंत्री रत्नागिरी जिल्हा यांनी दिनांक ७.१.२०२० रोजी रत्नागिरी येथील बैठकीमध्ये कोकणातील पर्यटन वृध्दीसाठी मौजे. आरे-वारे तालुका जिल्हा रत्नागिरी येथील समुद्रकिनाऱ्यालगत असणाऱ्या ७० एकर वन जमिनीवर जयपूरच्या धर्तीवर प्राणीसंग्रहालय तयार करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(२) व (३) विभागीय वन अधिकारी, रत्नागिरी (चिपळूण) यांच्यामार्फत प्राणी संग्रहालय उभारणीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

-----------------

## चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अधिग्रहण केलेल्या विंधन विहिरींची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * ७८२ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर (जि.लातूर) तालुक्यात गतवर्षी पाऊस कमी झाल्यामुळे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पाणी टंचाई निर्माण झाली असून ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार गावात ८४ विंधन विहिरी अधिग्रहित करण्यात येऊन कवठाळी, महाळंग्रावाडी, घारोळा, बेलगाव व रामवाडी या पाच गावात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतातील अधिग्रहण केलेल्या विंधन विहिरींची देयके पंचायत समितीकडून दिली जात असून माहे मे, २०१९ पर्यंतची शेतकऱ्यांची १८ लाख ६६ हजार रुपयांची देयके वाटप करण्यात आली परंतु जून ते ऑक्टोबर, २०१९ या महिन्यांतील रुपये ६० लाखांची देयके थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार आतापर्यंत किती शेतकऱ्यांना किती रुपयांचे वाटप केले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१८-१९ टंचाई कालावधीत चाकूर तालुक्यात ८४ खाजगी विंधन विहिरी अधिग्रहणाव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे. मौजे महाळंग्रावाडी व्यतिरिक्त अन्य ४ गावांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) विंधन विहीर अधिग्रहणाचे माहे जुलै, २०१९ अखेर पर्यंतची रु. ५३.१४ लक्ष रक्कमेची देयके अदा करण्यात आली असून उर्वरित देयके अदा करावयाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत

**(२५) * १०६७ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१८-१९ अंतर्गत १५६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना बळकटीकरण करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडे माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान येथे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली होणाऱ्या तांत्रिक समितीसमोर दिनांक ९ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली परंतु सदर प्रस्ताव अद्यापपर्यंत वितरीत केला नसल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत सुरु असलेल्या सर्व पाणीपुरवठा योजना थांबविण्याचे आदेश शासनाने दिले असल्याने अमरावती जिल्हयातील सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील पाणीटंचाई आराखडयातील रुपये २५ कोटींच्या कामांना स्थगिती मिळाली असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग १ व २ प्रकरणी चौकशी करुन दर्यापूरच्या प्रस्तावास निधीसह मान्यता देण्याबाबतचा आदेश वितरीत करणे तसेच अमरावती जिल्हयातील पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत फेरनिर्णय घेवून त्यावरील स्थगिती उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

१५६ गांवे (ता.दर्यापूर) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अमरावती यांच्या कडून या विभागास दिनांक २६.०७.२०१९ च्या पत्रान्वये प्राप्त झालेला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने दिनांक २२ जुलै, २०१९ च्या पत्रान्वये जुना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम आता जल जीवन मिशन या कार्यक्रमांतर्गत समाविष्ट केलेला आहे. त्यानुषंगाने शासनाच्या दिनांक २७.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये तात्पुरत्या स्वरुपात पाणीपुरवठा योजनांना स्थगिती देण्यात आली होती. केंद्र शासनाच्या दिनांक २५.१२.२०१९ रोजीच्या जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन शासनाच्या दिनांक ८ जानेवारी, २०२० व दिनांक १२.०२.२०२० च्या पत्रान्वये व दिनांक ३० जानेवारी, २०२० च्या परिपत्रकातील सुचनांनुसार पाणी पुरवठा योजनांबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे. १५६ गांवे (ता.दर्यापूर) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या बळकटीकरणाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली आहे.

शासनाच्या दिनांक ४.१०.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सन २०१९-२० या टंचाई कालावधीकरिता टंचाई कृती आराखडे तयार करण्याबबत व तद्नुषंगिक कार्यवाही करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंचायत समिती हवेली (जि.पुणे) अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१८-१९ ची कामे संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(२६) * ६१ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती हवेली (जि.पुणे) अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१८-१९ ची कामे संथ गतीने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांपैकी बहुतांश कामे ही सर्वेक्षण, अंदाजपत्रक तसेच निविदा मंजूर कामांची कार्यवाही होत नसल्याने प्रलंबित असून सदर योजनेत समाविष्ट असलेल्या गावांमध्ये भीषण पाणी टंचाई असून टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण पाणी पुरवठा बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, हवेली यांच्याकडे वारंवार बैठका, पत्राद्वारे पाठपुरावा केला जात असूनही संबंधित विभागाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यामधील ४५ गावे/वाडयांचा सन २०१८-१९ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामध्ये समावेश असून, सदर आराखडयामधील २४ गावे/वाडयांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी १७ गावे/वाडयांची निविदा प्रक्रीया पूर्ण करुन योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत ७ गावे/वाडयांच्या योजना निविदा प्रक्रीयेत आहेत.

उर्वरीत २१ योजनांपैकी ३ योजनांची अंदाजपत्रके तयार आहेत. ८ योजनांचे राज्यस्तरीय व विभागीयस्तरीवरील तांत्रिक छाननी समितीने काढलेल्या शेरेपुर्ततेमध्ये आहेत. उद्भव/टाकी या कामांसाठी जागा उपलब्ध न झाल्यामुळे १० योजनांचे सर्व्हेक्षण करणे बाकी आहे.

सन २०१८-१९ च्या आराखडयामधील प्रस्तावित करण्यात आलेल्या ७ गावे/वाडयांकरिता टँकरने पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात गुटखा बंदी कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(२७) * ३२० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: अकोला, सोलापूर जिल्ह्यात तसेच पनवेल (जि.रायगड) व काशिमिरा (जि.ठाणे) येथे गुटखा बंदी असतांना ग्रामीण व शहरी भागात तंबाखूजन्य पदार्थ व गुटखा लहान व मोठ्या दुकानांमध्ये विकला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वणी वारुळा (ता.अकोट, जि.अकोला) येथे ग्रामिण पोलीसांनी दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास छापा टाकून १० लाख रुपयांच्या मुद्देमालासह वाहन क्रमांक एमएच ३० बीबी १६८८ जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सोलापूर शहर आयुक्तालयातील गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जुना तुळजापूर नाका येथे ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये रुपये १ कोटी ३८ लाखाचा बनावट विषारी गुटखा जप्त करुन पाच जणांना अटक केल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने तंबाखुजन्य पदार्थ व गुटखा बंदी जाहीर करुन अनेक महिने होऊनही संबंधित विभागाने अंमलबजावणी न केल्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने लहान-मोठे दुकानदार सर्रासपणे तंबाखुजन्य पदार्थ व गुटख्याची विक्री करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गुटखा बंदी अंमलबजावणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या तसेच राज्यात पुर्णत: गुटखा बंदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) माहे जानेवारी, २०२० मध्ये अकोला जिल्हयातील वणी वारूळा, ता. अकोट येथे, सोलापूर शहरात व पनवेल (जि. रायगड) येथे अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी व पोलीसांनी संयुक्तरीत्या कारवाई करून वाहनातुन गुटखा तसेच प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त केलेला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दि. ०१ फेब्रुवारी, २०२० रोजी अन्न व औषध प्रशासनातील अधिकाऱ्यांनी व पोलीसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत, तुळजापुर नाका, सोलापुर येथुन एका वाहनातुन एकुण रू. १९,१५,०००/- किमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा व रू. ९,५०,०००/- किमतीचे वाहन असा एकुण रू. २८,६५,२००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

सदर प्रकरणी ०२ व्यक्तीविरूध्द जोडभावी पोलीस स्टेशन, सोलापुर येथे दि. ०१.०२.२०२० रोजी भारतीय दंड विधानातील तसेच अन्न सुरक्षा व मानदे कायद्यातील कलमान्वये प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.

(५) माहे जानेवारी, २०२० मध्ये कारवाई करण्यात आलेल्या सोलापुर, अकोला व पनवेल येथील प्रकरणात अन्न व औषध प्रशासनाव्दारे संबंधितांविरूध्द पोलीसांत प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. पोलीसांकडून सदर प्रकरणाची पुढील चौकशी सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यातील मार्कंडा देवस्थानच्या पर्यटन व बाहयवळण रस्त्याच्या कामास विलंब होत असल्याबाबत

**(२८) * ३५४९ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मार्कंडा (जि.गडचिरोली) देवस्थान हे विदर्भातील काशी मानली जात असून या क्षेत्राच्या विकासकामांसाठी रुपये ५ कोटी व बाह्यवळण (बायपास) रस्त्याकरिता निधि मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामांसाठी निधि उपलब्ध असूनही अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्या निष्काळजीपणामुळे सदर कामांना विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे खरे आहे.

पर्यटन विभागाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये मार्कंडादेव येथील पर्यटनस्थळ विकासासाठी रु.४९०.३६ लक्ष च्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मार्कंडादेव गावाच्या वळण मार्गाच्या कामासाठी भूसंपादन करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

पर्यटन विभागाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये मार्कंडादेव येथील पर्यटनस्थळ विकासासाठी रु.४९०.३६ लक्षच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन या कामासाठी रु.२००.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना वितरीत करण्यात आला आहे. सदर निधीमधून मार्कंडादेव या ठिकाणी टॅक्सी पार्कींग सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सुलभ शौचालय बांधकाम, बंद गटार फुटपाथ व नदीवर साकव इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित कामे भारतीय पुरातत्व विभागाच्या परवानगीनंतर सुरु करण्यात येतील.

मार्कंडादेव गावाच्या वळण मार्गाच्या भूसंपादनासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रु.७५.०० लक्ष निधी अर्थसंकल्पात मंजूर झालेला असून त्यानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, गडचिरोली यांच्यामार्फत भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) येथील राजराजेश्वर मंदीराला 'क' वर्ग तिर्थक्षेत्र घोषीत करण्याबाबत

**(२९) * २८०७ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) येथील राजराजेश्वर मंदीराला 'क' वर्ग तिर्थक्षेत्र घोषीत करण्याबाबत बल्लारपूर येथील लोकप्रतिनीधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना दिनांक २२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) होय.
(२) सदर तिर्थक्षेत्र नगर पंचायत पोंभूर्णा यांच्या कार्यक्षेत्रात असल्यामुळे सदर निवेदन मुख्याधिकारी, नगर पंचायत, पोंभूर्णा यांच्याकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील ४७ टक्के पाण्याचे नमुने बाधित आढळल्याबाबत

**(३०) * २२७८ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात दिनांक १ ऑक्टोंबर, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीत पाण्याच्या नमुन्यांची रसायनिक तपासणी केली असता जिल्ह्यातील ४७% पाणी नमुने बाधित असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाधित पाणी असलेल्या गावांमध्ये किडनीच्या आजारात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पाण्याचे बाधित आढळलेल्या गावांमध्ये शुद्ध पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

दिनांक १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीमध्ये बुलढाणा जिल्हयातील १३ तालुक्यातील ५९९ गावामधील २६३९ पाणी नमुन्यांची रासायनिक तपासणी करण्यात आली असता, ४०१ गावामध्ये १२०५ पाणी नमुने बाधित आढळून आले आहे. बाधित नमुन्यांची टक्केवारी ४५.६६ % एवढी आढळून आली आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१७ -१८ मध्ये २५ गावामध्ये किडनीच्या रूग्णांची संख्या २०६ आढळून आली तर सन २०१८-१९ मध्ये २० गावामध्ये किडनी रूग्णांची संख्या १२८ आढळून आली.

(३) बाधित ४०१ गावामध्ये खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

I) ३७६ गावांना नळ पाणी पुरवठा योजनेव्दारे शुध्द पाणी पुरवठा करण्यात येतो.

II) ११ गावांमध्ये नळ पाणी पुरवठा योजना प्रगतीपथावर आहेत.

III) १० गावांमध्ये नळ पाणी पुरवठा योजना प्रस्तावित आहेत.

IV) ४ गावांना हातपंप/सार्वजनिक विहिरी वरून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाची "हिरकणी कक्ष" योजना बंद असल्याबाबत

**(३१) * ५४०२ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसने प्रवास करणाऱ्या मातांना बाळाला स्तनपान देण्यासाठी "हिरकणी कक्ष" योजना राबविण्याच्या घेतलेल्या निर्णयाची योग्य अंमलबजावणी न झाल्यामुळे बहुतांश ठिकाणचे "हिरकणी कक्ष" बंद असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील कुर्ला नेहरुनगर, मुंबई सेंट्रल आणि परळ स्थानकातील तसेच पुणे, विदर्भ, मराठवाडा विशेषता अहमदपूर (जि.लातूर) यासारख्या राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकावर उभारण्यात आलेले हिरकणी कक्ष जनजागृती अभावी बंद स्थितीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त योजना पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांमधील महिला घटकास प्रोत्साहन देण्यासाठी व स्तनदा मातांची सोय होण्यासाठी बसस्थानकामधील उपलब्ध असलेल्या जागेमध्ये महिलांसाठी हिरकणी कक्ष उभारण्याचा निर्णय घेण्यात आला व राज्यातील जिल्हा, तालुका व प्रमुख

शहरातील सुमारे १८२ बसस्थानकांवर हिकरणी कक्ष उभारले असून, सदरची हिरकणी कक्ष अद्यापही कार्यान्वित आहेत व महामंडळाच्या दि.२९.०५.२०१९ अन्वये उर्वरित सर्व बसस्थानकांवर उपलब्ध असलेल्या जागेमध्ये ''हिरकणी कक्ष'' उभारण्याबाबत तसेच हिरकणी कक्ष नियमित कार्यरत राहण्याच्या दृष्टीने खबरदारी घेण्यासाठी सर्व विभागांना सुचना प्रसारित करण्यात आल्या आहेत.

तसेच, बसस्थानक आधुनिकीकरण/पुनर्बांधणी सुरु असलेल्या व प्रस्तावित असलेल्या बसस्थानकांच्या कामांमध्ये हिरकणी कक्ष तयार करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील पांडवकडा या निसर्गरम्य स्थळाचे सौंदर्यीकरण व विकास करण्याबाबत

**(३२) * ४१७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील पांडवकडा या निसर्गरम्य स्थळाच्या पर्यटनाला चालना मिळण्याच्या दृष्टीने सौंदर्यीकरण व विकास करण्याच्या दृष्टीकोनातून आराखडा तयार करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि., बेलापूर यांच्याकडे निवदेनाद्वारे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निसर्गरम्य पांडवकडा हा पावसाळी धबधब्यासाठी तसेच निसर्गरम्य वनराईसाठी प्रसिद्ध असून दरवर्षी पावसाळयात हजारो पर्यटक भेट देत असले तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने व पर्यटकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्थळाचे सुशोभिकरण व विकास केल्यास स्थानिक भुमीपुत्रांना उपजिवीकेचे साधन उपलब्ध होणार असल्याने उक्त प्रकरणी निधी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) नवी मुंबई मधील खारघर येथील पांडवकडा धबधब्याच्या परिसरात पक्क्या स्वरुपाचा पोहच रस्ता नसल्याने धबधब्याजवळ जाण्याकरीता सुरक्षीत पायवाट, रेलिंग, उपहारगृह, प्रसाधनगृह, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी सोयी-सुविधा नसल्याने पर्यटकांची गैरसोय होत आहे.

सबब, सिडकोने उक्त परिसराचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून संकल्पनात्मक नकाशा तयार केला असून त्यानुसार १.५ कि.मी. लांबीचा रस्ता, पार्कीग, शौचालय, लॉकर सुविधा, लाकडी मचान आणि तात्पुरत्या स्वरुपाचे उपहारगृह इत्यादी प्राथमिक सोयी-सुविधा उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयात एस.टी. बस विहिरीत कोसळून झालेला अपघात

**(३३) * ५३६० श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बबनराव शिंदे**

**(माढा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण-धुळे (जि.नाशिक) मार्गावरील दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास राज्य मार्ग परिवहन मंडळाची एस.टी. बस सौदाणे-देवळा रस्त्याने जात असताना एसटीचा टायर फुटल्याने, रिक्षाला जोरदार धडक बसून दोन्ही वाहने रस्त्याच्या कडेला असलेल्या साठ फूट खोल विहीरीत पडून एसटी बसच्या चालकासह बसमधील १७ व रिक्षातील ९ प्रवाश्यांचा मृत्यू आणि ३५ जण जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अपघातातील मृत व जखमींना कोणती आर्थिक मदत केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे आहे.

परंतू, सदरचा अपघात राज्य परिवहन बसचे टायर फुटल्याने झालेला नाही.

(२) सदर अपघाताची चौकशी पोलिस विभाग व राज्य परिवहन महामंडळाकडून करण्यात आली असून या दोन्ही प्राथमिक चौकशीत सदर अपघातास राज्य परिवहन चालक जबाबदार असल्याचे आढळून आले आहे.

राज्य परिवहन बस चालकाविरुध्द मृत्युपश्चात देवळा पोलिस स्टेशन येथे भा.दं.वि. कलम ३०४,२७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सुरु आहे.

सदर अपघातातील अपघातग्रस्त व त्यांचे वारसांना राज्य परिवहन महामंडळाकडुन एकूण रु.१,९७,५००/- एवढी आर्थिक तात्कालीक मदत देण्यात आली आहे. अपघात नुकसान भरपाई मागणीस्तव 'पी' फॉर्म देण्यात आले असून त्यांचेकडुन 'पी' फॉर्म भरुन घेऊन दि.१७.०२.२०२० अखेर १४ मृत प्रवाशांचे वारसांना प्रत्येकी रु.१०.०० लाख प्रमाणे एकुण रु.१ कोटी ४० लाख अंतिम नुकसान भरपाई देण्यात आली आहे. तसेच, मृतांपैकी राज्य परिवहन चालकाचे वारसास श्रमिक नुकसान भरपाई कायद्याअंतर्गत रु.५,१३,३२०/- रक्कम अदा करण्यात आली आहे. तसेच, मृतांपैकी ०१ मृताचे वारस मा.न्यायालयात जाणार असल्याने त्यांनी नुकसान भरपाई स्विकारण्यास नकार दिला आहे.

उर्वरीत राज्य परिवहन बसमधील १ प्रवाशी व ॲपे रिक्षातील ९ व्यक्ती असे एकूण १० मृतांच्या वारसास व ३५ जखमींना अंतिम नुकसान भरपाई अदा करण्याकरीता महामंडळाद्वारे स्वंतत्र पथके तयार करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खारेपाट विभागातील (ता.पेण, जि.रायगड) येथील हेटवणे-शहापाडा पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण करणेबाबत

**(३४) * १९६६ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारेपाट विभागातील (ता.पेण, जि.रायगड) ३६ गावे व ४२ वाडयांकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत हेटवणे-शहापाडा ही धरण जोडणारी योजना मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतील निम्मी गावे व वाडयांमध्ये वितरण व्यवस्था नसल्याने तसेच उपरोक्त योजनेच्या कामास प्रत्यक्ष सुरूवात होवून व मुदत संपूनदेखील अद्यापपर्यंत केवळ ५० ते ६० टक्केच काम झालेले असल्याने ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या संथगतीने सुरु असलेल्या कामाबाबत सबंधित यंत्रणा उदासीन असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, सदर योजनेमधील सर्व गाव/वाड्यांना पाणी पुरवठा होण्याच्यादृष्टीने शासनाने उपरोक्त योजनेचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय.
(२) योजनेचे ७० % काम पूर्ण झाले असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.
स्थानिक अडचणींमुळे विलंब झाला आहे.
(४) सदर कंत्राटदारावर विलंबासाठी दंड आकारण्यात आला आहे. सदर योजना कार्यान्वित करुन योजनेतील समाविष्ठ गावांना उन्हाळ्यापर्यंत पाणी पुरवठा सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत नागपूर विभागातील दुष्काळग्रस्त गावांमधील शाळांना अनुदान मिळाले नसल्याबाबत

**(३५) * २१९२ श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत दुष्काळग्रस्त गावांमधील शाळेतील विद्यार्थ्यांना नियमीत पोषण आहारासोबत आठवड्यातून तीन दिवस पुरक आहार देण्याचा शासनाने निर्णय घेतला असून त्याचवेळेस प्रतिदीन प्रतिविद्यार्थी ५ रु. देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर विभागातील दुष्काळग्रस्त भागातील शाळांमध्ये मागील ५ महिन्यापासून शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत अनुदान अद्यापही प्राप्त झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील ५ महिन्यापासून अनुदान प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच सदर योजनेअंतर्गत नागपूर विभागातील किती शाळांना अनुदान देण्यात आले आहे वा देण्यात येत आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) शासन निर्णय दिनांक २९/०५/२०१७ अन्वये शालेय पोषण आहार योजनेतंर्गत दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना आठवडयातून तीन दिवस दूध/अंडी/फळे/पौष्टिक आहार देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. यासाठी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रू.५ याप्रमाणे प्रतिआठवडा रू.१५ अशी खर्च मर्यादा निश्चित केली आहे.

(२) व (३) शाळास्तरावर देण्यात आलेल्या पुरक आहाराची परिपूर्ण देयकांची माहिती तालुकास्तरावरुन एकत्रित जिल्हयांना देण्यात येते. जिल्हास्तरावरुन संबंधित शाळांना प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यात येते. त्यानुसार नागपूर विभागातील परिपूर्ण देयके प्राप्त झालेल्या शाळांना अनुदान वितरीत केले आहे.

(४) नागपूर विभागातील सदर अनुदानासाठी पात्र असलेल्या ३५५३ शाळांपैकी सद्यस्थितीत २९६३ शाळांना आवश्यक अनुदान वितरीत केलेले आहे. उर्वरित ५९० शाळांची पुरक आहाराची परिपूर्ण देयके जिल्हास्तरावर प्राप्त करून अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## सातोद (ता.यावल, जि.जळगांव) येथे राष्ट्रीय पेयजल योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३६) * २४११ श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सातोद (ता.यावल, जि.जळगांव) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे व नियमबाह्य करून गैरव्यवहार केला असल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव याच्याकडे दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नियमबाह्य कामाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात दोषी असलेले संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय.

(२) तक्रारदाराने निकृष्ट कामे व अपूर्ण कामे पूर्ण करुन अंतिम देयक अदा करण्याविषयी तक्रार केली आहे. प्राप्त तक्रार अर्जानुसार उप विभागीय अभियंता यांनी तक्रारदार यांच्या समवेत योजनेच्या कामाची दिनांक २९.०५.२०१८ रोजी प्रत्यक्ष पहाणी केली असता, तक्रारदार यांनी ठेकेदाराने केलेल्या कामाबाबत समाधान झाले असल्याचे लेखी स्वरुपात दिले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दाभोळ (जि.रत्नागिरी) खाडीतील कोट्यवधी रूपये किंमतीच्या हाऊसबोटींची झालेली दुरवस्था

**(३७) * २०१० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभोळ (जि.रत्नागिरी) खाडीतील पर्यटनाला चालना देण्यासाठी शासनाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून खरेदी केलेल्या सुमारे रूपये ३ कोटी इतक्या रक्कमेच्या दोन्ही हाऊसबोट सद्यस्थितीत खाडीपात्रात बुडालेल्या अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प राबविण्यास विलंब करुन शासनाचे नुकसान करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच सदर प्रकल्प पुन्हा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हाऊसबोटीच्या तळभागात छिद्रे पडून मोठ्या प्रमाणात हाऊसबोटीमध्ये पाणी येत होते. त्यामुळे हाऊसबोटी सुरक्षिततेच्या दृष्टीने पाण्याबाहेर काढून सागरी किनारी सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

हाऊसबोटीच्या प्रचलन व देखभालीवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्याने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने हाऊसबोटीचे प्रचलन खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार खाजगी संस्थेची नेमणूक करण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या मात्र प्रथम दोन प्रयत्नात एकही निविदा प्राप्त झाली नाही. तिसऱ्या निविदा प्रक्रियेनुसार नियुक्त करण्यात आलेल्या निविदा धारकाकडून हाऊसबोटीच्या प्रचलनाची कार्यवाही होत नसल्याने केलेल्या सागरी सल्लागार यांच्या सल्ल्यानुसार महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ पुढील कार्यवाही करीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजना पुनश्चः कार्यान्वित करणेबाबत

**(३८) * ३६८२ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत गरजू अल्पसंख्याक लाभार्थ्यांना विविध योजनेंतर्गत आर्थिक मदत केली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत काही वर्षापासून स्वयंरोजगाराच्या अनुषंगाने महत्वाच्या असलेल्या मुदत व थेट कर्ज पुरवठा योजना बंद असल्याने त्या सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक विकास महामंडळाने या योजनेच्या माध्यमातून कर्ज पुरवठा करण्यासाठी आवश्यक असणारे अंतिम निकष ठरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रस्तावावर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक :** (१) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत कर्ज योजना राबविल्या जातात.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) सद्य:स्थितीत महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना सुधारीत पध्दतीने राबविण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत महामंडळाला आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) मध्यवर्ती बस स्थानकाच्या नव्या हायटेक इमारतीच्या प्रलंबित कामाबाबत

**(३९) * ४७२३ श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील बसस्थानकाचा कारभार गेल्या वर्षभरापासून तेथील एका पत्र्याच्या शेडमध्ये चालविला जात असल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिपळूण येथील नव्या बसस्थानकाच्या हायटेक इमारतीच्या बांधकामास शासनाने मान्यता देऊन त्याबाबत शासनस्तरावर निविदा काढून सदरचे बांधकाम करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित ठेकेदारांमार्फत जमिनीपासून केवळ ८ इंचच बाधकाम करुन सदर बांधकाम आहे त्या स्थितीत बंद केल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१), (२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाने चिपळूण मध्यवर्ती बसस्थानकाची पुनर्बांधणी करण्याकरिता रु.५.८५ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली. तदनंतर महामंडळाकडून सदर कामासाठी निविदाप्रक्रियेद्वारे मे.स्कायलार्क कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना नियुक्ती देवून, महामंडळाच्या दि.०७.११.२०१७ च्या पत्रान्वये कार्यादेश देण्यात आला. सदर कार्यादेशांन्वये काम पुर्ण करण्याचा कालावधी २४ महिने म्हणजेच दि.०७.११.२०१९ पर्यंत होता. तथापि चिपळूण नगरपरिषदेकडून बसस्थानक बांधकाम परवानगी उशीराने मिळाली. तसेच सदर बसस्थानकाची पुनर्बांधणी ही अस्तित्वातील बसस्थानकाची इमारत तोडून त्याच ठिकाणी नविन बसस्थानक बांधावयाचे असल्याने प्रवाशांची गैरसोय व महामंडळाच्या दैनंदिन उत्पन्नात घट होवू नये यासाठी पर्यायी बसस्थानकाची व्यवस्था करण्यात आली व त्यानुसार इमारतीतील आस्थापनांचे स्थलांतर करण्यात आले. बसस्थानकाच्या अर्ध्या भागाचे पायातील काम व जमीन लेवलवर प्लींथ काम पुर्ण झाल्यानंतर अतिवृष्टीमुळे सदरचे काम बंद ठेवण्यात आले होते. सद्यस्थितीत जानेवारी, २०२० पासून अर्ध्या भागातील प्लींथ पी.सी.सी. पर्यंतचे काम पुर्ण झाले असून, पुढील भागातील फुटींगचे काम चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाटस (ता.दौंड, जि.पुणे) येथे एस.टी. बस आगार सुरु करण्याबाबत

**(४०) * ४५३७ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटस (ता.दौंड, जि.पुणे) येथील एस.टी.डेपो चा प्रश्न सन २००५ पासून प्रलंबित असून त्यासाठी पाटस ग्रामस्थांनी माहे जुलै-ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आमरण उपोषण पुकारले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बी ओ टी तत्त्वावर सदर बस स्थानक उभारण्याची मागणी तत्कालीन लोकप्रतिनिधींनी तसेच ग्रामस्थांनी वारंवार, मा. मंत्री, विभागीय संचालक, व्यवस्थापकीय संचालक तसेच अध्यक्ष, परिवहन महामंडळ यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी शासनाकडून १.१४ आर शासकीय भूखंड मंजूर केला असून त्याचा अतिक्रमण विरहित ताबा मिळण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक ३ नोव्हेंबर, २००८ रोजी वा त्यासुमारास बैठक देखील घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणी एस.टी. बस डेपो सुरु करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१), (२) व (३) होय.
(४) जिल्हाधिकारी पुणे यांनी पाटस येथे दिलेली जमिन बसस्थानक उभारण्याकरिता उपयुक्त नसल्याने सन २००४ पासून अतिक्रमण विरहित व सलग जागा बसस्थानकासाठी देणेबाबत महसूल विभागाकडे महामंडळाद्वारे पाठपुरावा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील शालेय विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप करण्याबाबत

**(४१) * ५००७ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष संपत आले तरी मोफत सायकल वाटप अद्याप करण्यात आले नसल्याचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १९४७ विद्यार्थ्यांना मोफत सायकली वाटप करण्यासाठी ६८ लाख १४ हजार रुपयांचा निधी दिड महिन्यापुर्वी मानव विकासाकडून शिक्षण विभागाकडे वर्ग केला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मानव विकास कार्यक्रतांर्गत जिल्ह्यातील तीन तालुके असून या मध्ये सेनगाव ६६६ हिंगोली ६६६ व औढा नागनाथ तालुक्यातील ६१५ मुलींना मोफत सायकल वाटप करण्यात येणार आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) तसेच शालेय विद्यार्थ्यांना दरवर्षी वेळेवर मोफत सायकल मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) दि.०४/०१/२०२० रोजी लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शाळेच्या खात्यावर निधी वर्ग केलेला आहे.

(५) शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर तात्काळ संबंधित लाभार्थी यांच्या खात्यावर निधी वर्ग करण्याच्या सूचना संबंधिताना देण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नळेगाव (जि.लातूर) व इतर दहा गावांच्या पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(४२) * ५०४३ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळेगाव (जि.लातूर) येथील मध्यम प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा असतानाही मागील अडीच महिन्यापासून थकीत वीजबिलामुळे येथील पाणीपुरवठा बंद असल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नळेगावासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याची आवश्यकता असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणी नदीवरील धरणी मध्यम प्रकल्पावर शिवपूरसह नऊ खेडी पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत असून या योजनेवरुन नळेगांव, लिंबाळवाडी, धरणी, वडवळ, शिवपूर, सुगाव, देवग्रा, उजेड, हिप्पळगांव आदि अकरा गावांना पाणीपुरवठा होतो तसेच धरणी मध्यम प्रकल्पात पुरेसा पाणीसाठी असतानाही वीजबिलापोटी तेथील महावितरणांकडून वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणाची चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नळेगांवकरिता नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यासाठी आणि वरील इतर ११ गावातील नागरिकांच्या पाणीपुरवठयासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सदर योजनेचे कार्यान्वय जिल्हा परिषद, लातूर यांचेमार्फत करण्यात येते. सदर योजनेचे विद्युत देयक थकीत असल्यामुळे योजना दि.१६/११/२०१९ पासून बंद होती. या योजनेची माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत रु.४२०.२३ लक्ष थकबाकी असून एप्रिल २०१९ ते डिसेंबर, २०१९ पर्यंत रु.३४.०० लक्ष किंमतीच्या ५०% रक्कम भरण्यास महावितरण कंपनीने सांगितले. मात्र याबाबत दि.५/२/२०२० रोजी हमीपत्र महावितरण कपंनीस दिल्याने विद्युत जोडणी करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील खाजगी अनुदानित शाळांच्या स्वयंपाकगृहाचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(४३) * ३८१३ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खाजगी अनुदानित शाळांना स्वयंपाकगृहाच्या बांधकामास ५ वर्षापासून निधी मिळूनही बांधकाम करणे अनिवार्य असतानाही अद्याप ९३ शाळांनी स्वयंपाकगृहाचे बांधकाम केले नसल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले व त्यानुसार निधी उपलब्ध असूनही बांधकाम न करणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) केंद्र शासनाच्या नियमानुसार ज्या खाजगी अनुदानित शाळांनी स्वत: २५ टक्के निधी खर्च करुन स्वयंपाकगृह बांधकाम Plinth Area Norms पर्यंत पूर्ण केले आहे, अशा शाळांना उर्वरीत बांधकामांसाठी ७५ टक्के निधी देण्यात येतो. सदर निकषानुसार अमरावती जिल्हयातील पात्र ठरलेल्या ११२ खाजगी अनुदानित शाळांमध्ये स्वयंपाकगृह बांधकामासाठी निधी देण्यात आला आहे. त्यापैकी ८५ शाळांमध्ये स्वयंपाकगृह बांधकामे पूर्ण झाली असून २७ शाळांमधील स्वयंपाकगृह बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमधील बोगस शिक्षकांच्या नेमणूकांबाबत

**(४४) * २५३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांचे बनावट आदेश देऊन बोगस शिक्षकांच्या नेमणूका करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शिक्षकांच्या बोगस नेमणूका प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून या दरम्यान शिक्षण विभागाने नेमलेल्या पडताळणी पथकाचे काम अतिशय संथ गतीने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षणाधिकारी आणि संस्थाचालक यांच्या संगनमताने शिक्षक मान्यता आणि तुकड्या मान्यतेचे बनावट आदेश देण्यात आलेले शिक्षक संबंधित शाळांमध्ये कार्यरत असून मागील अनेक वर्षांपासून वेतन घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाची फसवणूक करून शिक्षकांची नेमणूक करून नियमबाह्यरित्या शिक्षक व तुकड्या मान्यतेचे आदेश देऊन झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून शासनाने काय कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) प्रकरणी चौकशी करुन संबंधित अधिकारी, संस्थाचालक तसेच संबंधित शिक्षक अशा २८ व्यक्तींवर बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------------

## झोडगा (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) येथे नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करणेबाबत

**(४५) * ६२२२ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोडगा (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) येथे कार्यरत असलेली पाणी पुरवठा योजना अपयशी ठरल्याने सदर गावाला पूर्ण क्षमतेने पाणी पुरवठा न होता २० दिवसाआड पाणी पुरवठा होत असल्याने पाणी टंचाई निर्माण झाल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार झोडगा येथे नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) मौ.झोडगा (ता.मलकापूर, जि.बुलडाणा) येथे अस्तित्वात असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेव्दारे गावाची मागणी पुर्ण होऊ शकत नसल्याने शासनाने दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये नळ पाणी पुरवठा योजना मंजुर केली असून योजनेची कामे प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील रासायनिक सांडपाणी प्रक्रिया न करता जगबुडी आणि वशिष्ठी नदीत सोडत असल्याबाबत

**(४६) * २०१९ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील घातक रासायनिक सांडपाणी प्रक्रिया न करता सोनपात्रा नदीमार्गे जगबुडी आणि वशिष्ठी नदीत सोडण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणात मासे मृत होत असल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) त्यामुळे मच्छीमार व्यवसायावर उपजीविका करणारा मच्छिमार बांधव व भोई समाज आर्थिक संकटात सापडला असून त्यांनी जलआंदोलन, उपोषणे व विविध प्रकारची आंदोलने करून तसेच पत्रव्यवहाराद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिपळूण येथील वशिष्ठी नदीचे शुध्दीकरण करण्यात येणार असल्याची घोषणा मा.मंत्री, पर्यावरण यांनी माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली असून यासाठी किती निधी मंजूर करण्यात आला आहे,

(४) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाकडून कोणतीही दखल घेण्यात न आल्याने दुषित पाणी सोडणारे कारखानदार आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांच्यात आर्थिक हितसंबंध असल्याचा आरोप मच्छिमार भोई समाजाने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रदुषणकारी कारखानदारांना पाठीशी घालणाऱ्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे तसेच मच्छिमार भोई समाजाला नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) वशिष्ठी नदीवरील कोतवली नाल्यावर प्रक्रिया करण्यासाठी नाल्यातंर्गत फायटोरिमेडिएशन तंत्रज्ञान वापरुन सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राबविण्यात येणार असून याकरिता रुपये १ कोटी ५३ लक्ष ४० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सदर कामाचा कार्यादेश मार्च, २०१९ मध्ये निर्गमित करण्यात आला असून काम प्रगती पथावर आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन सांडपाण्याची गुणवत्ता तपासण्यात येते व दोषी उद्योगांवर जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील एस.टी. व शिवशाही वातानुकूलित बसेसच्या अपघातांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(४७) * २९७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एस.टी.चालकांमध्ये सुरक्षेबाबत प्रबोधन करण्याच्यादृष्टीने दरवर्षी सुरक्षा अभियान राबवण्यात येत असले तरीही अपघातांमध्ये सातत्याने वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षांच्या तुलनेत एस.टी. अपघातांमध्ये वाढ झाली असून वर्षभरात एकूण ३७८ अपघात अधिक झाले असून पुणे, एस टी महामंडळाच्या शिवशाही वातानुकूलित बसेसचे एप्रिल ते सप्टेंबर, २०१९ मध्ये व त्यादरम्यान २२१ अपघात झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवशाहीच्याअपघातांमध्ये लक्षणीय वाढ झाली असल्याने प्रवाशांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळे दिनांक १ एप्रिल ते १५ डिसेंबर, २०१९ अखेर महामंडळाचे भारमान गेल्या वर्षीच्या तुलनेत तीन टक्क्यांनी घटले आणि ते ५४ टक्यावर आले आहे हे हि खरे आहे काय,

(४) तसेच सुरक्षा सप्ताहाशिवाय वर्षभर अपघातांपासून बचाव व्हावा यासाठी शासनाकडून कोणता कार्यक्रम राबविण्यात येत आहे वा येणार आहे,
(५) असल्यास, उपरोक्त घटनांची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) होय.
(२) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसनां सन २०१६-१७ मध्ये एकूण २७७२, सन २०१७-१८ मध्ये एकूण २९३३ व सन २०१८-१९ मध्ये ३३१० एवढे अपघात झालेले असून, मागील दोन वर्षाच्या तूलनेत ३७७ अपघात वाढलेले आहेत.

एप्रिल ते सप्टेंबर २०१९ या कालावधीत पुणे विभागातील शिवशाही वातानुकुलित बसेसचे एकूण १७ अपघात झालेले असून, सदर अपघातांमध्ये स्वमालकीच्या ३ व भाडेतत्वावरील १४ बस अपघातांचा समावेश आहे.
(३) हे खरे नाही.

दि.०१.०४.२०१८ ते दि.१६.१२.२०१८ या कालावधीत महामंडळाचे प्रवासी भारमान ५४.५४ टक्के एवढे होते. तर दि.०१.०४.२०१९ ते दि.१६.१२.२०१९ या कालावधीत ५३.७८ एवढे भारमान होते. म्हणजेच सन २०१८ च्या तूलनेत सन २०१९ च्या भारमानात ०.७७ ने घट झालेली आहे. सदर भारमानातील घट सन २०१९ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे महामंडळाची वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे झालेली आहे.
(४) व (५) राज्य परिवहन महामंडळाच्या बस अपघात टाळण्याच्या अनुषंगाने महामंडळाद्वारे नियुक्तीपुर्वक ४८ दिवसांचे सेवापुर्व प्रशिक्षण, उजळणी प्रशिक्षण, अपघात जास्त असलेल्या चालकांना संगणकीकृत चाचणी पथावर प्रशिक्षण इत्यादी उपाययोजनांबरोबरच वेर्स्टन इंडिया ऑटोमोबाईल असोशिएशन यांचेद्वारे प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच, ३१ समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली असून, चालकांच्या डोळ्यांची दृष्टी तपासणी करण्यात येते. त्याचबरोबर चालकांना अपघात प्रवण क्षेत्राची माहिती देण्यात

येत असून, अपघात विरहीत सेवा करणाऱ्या चालकांचा रोख रक्कम देऊन गौरव करण्यात येत असून, विनाअपघात सेवा देण्याबाबत चालकांना प्रोत्साहीत करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.